Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 5, December 2023; Pages 25 – 29
DOI: 10.5281/zenodo.10071728

Original Research Article

# गरिबी निर्मुलनासंदर्भातील गांधी विचाराचे तात्त्विक विवेचन

प्रा. डॉ. बाजीराव माणिकराव पाटील

विभाग प्रमुख, तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र विभाग, विद्यावर्धिनी सभेचे, डॉ. एम. वाय. वैद्य कला, प्रो. पी. डी. दलाल वाणिज्य, अणि डी. एस. शाह विज्ञान महाविद्यालय, धुळे ४२४००१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: bajiraopatil151@gmail.com

Received: 01 October, 2023 | Accepted: 21 October, 2023 | Published: 26 October, 2023

## प्रस्तावना

भारत हा 80% खेड्यामध्ये वसलेला, जगामध्ये मोठी लोकसंख्या म्हणून ओळखला जाणारा देश, अधिक तरुणांचा देश म्हणून सुद्धा ओळखला जातो. भारतातले जवळजवळ 80% लोक शेती करतात व 20 टक्के लोक वेगवेगळे व्यवसाय करतात पण भारताच दुर्दैव असं आहे की 80% असलेल्या शेती व्यवसायाच्या सुधारणेकडे म्हणावे तेवढे सरकारी यंत्रणेचे लक्ष दिसून येत नाही. त्यामुळे देशामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये गरिबी दिसून येते, ही गरिबी दूर करायची असेल तर शेतीकडे आणि शेतकऱ्याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे सर्वच राजकारणी जोपर्यंत शेतीकडे व शेतकऱ्याकडे पुरेपूर लक्ष देणार नाहीत तोपर्यंत देशातली गरिबी दूर होणार नाही, असा माझा ठोस दावा आहे. महात्मा गांधीजींनी रामराज्याचे स्वप्न खेडे डोळयासमोर ठेवूनच बघितलेलं होतं. भारत देशामध्ये अनेक लोक शेतावरती अवलंबून आहेत. भारत देश हा मोठ्या लोकसंख्येचा देश असून त्यात बहुसंख्य तरुण आहेत आणि या सर्व तरुणांच्या हाताला काम मिळणं तेवढंच महत्त्वाचं आहे परंतु आज आपल्या देशामध्ये गरिबी निर्मूलनासाठी वेगवेगळया प्रकारच्या अनेक योजना राबवल्या जातात, परंतु त्या केवळ आणि केवळ कागदावरतीच राबवल्या जात आहेत. आशान गरिबी निर्मूलन कदापीही होऊ शकणार नाही. कारण देशात एवढी मोठी लोकसंख्या असताना सुद्धा या वेगवेगळया योजना पूर्ण करण्यासाठी गुत्तेदार, ठेकेदार पर्यायाने सरकार सुद्धा मोठ्या प्रमाणात यंत्राचा वापर करताना दिसते.

## महात्मा गांधीजी यंत्रविरोधी होते असे नाही

केवळ आधुनिक तंत्रज्ञान म्हणजेच विज्ञान नाही, विज्ञान ही एखादा प्रश्न सोडवण्याची पद्धत आहे. आधुनिक यंत्रांना तंत्रज्ञानांना मानसाच्या डोक्यावर बसू न देता मानवी जीवन अधिक समाधानी अधिक मानवतावादी बनवण्यासाठी विज्ञानाचा वापर केला पाहिजे. हा गांधीजींचा हेतू होता परंतु गांधीजींना जी भीती सतावत होती नेमकं तेच घडलं आणि आपल्या देशामध्ये जवळजवळ सर्वच क्षेत्रांमध्ये अधिकाधिक यंत्राचा वापर करून कामे केली जात आहेत. पर्यायाने तरुणाई कामाच्या शोधात आहे, काम नसल्यामुळे लाखो बेकार तरुण रस्त्याने फिरताना दिसत आहेत. उदाहरणार्थ एका

बँकेमध्ये दहा कर्मचारी लागत असतील तर त्या दहा कर्मचाऱ्यांचे काम एक संगणक करत असल्याने, दहा लोक आज रिकामटेकडे बनलेले आहेत. रोजगार हमी योजनेच्या नावाखाली गरिबांना रोजगार उपलब्ध करून दिला जातो, त्यात रस्त्याची बांधणी, नवीन तलावाची निर्मिती, विहिरींची निर्मिती केली जाते. त्यातून नवीन रस्ते, नवीन तलाव, नवीन विहिरी तर निर्माण होतातच. परंतु ते काम रिकामे फिरणाऱ्या तरुणांकडून करून घेतलं तर त्यांना जीवन जगण्यासाठी रोजगाराची संधी उपलब्ध होईल. परंतु हेच काम अधिक पैशाच्या हव्यासापोटी ठेकेदार गुत्तेदार व सरकार मशीन द्वारे लवकरात लवकर पूर्ण करत आहेत. त्यामुळे हजारो हात बेकारीच्या खाईमध्ये बुडालेले आहेत. अशा परिस्थितीत या बेकारीचे रुपांतर वाढत्या गुन्हेगारीमध्ये होताना दिसून येत आहे. समाजामध्ये फसवेगरी, चोऱ्या इत्यादीचे प्रमाण वाढून न्यायव्यवस्थेवर व पोलीस यंत्रणेवर भार पडत आहे. त्याचप्रमाणे खाली दिमाग शैतान का घर या म्हणीप्रमाणे हे रिकामटेकडे तरुण अनेकदा जातीय धार्मिक तेढ निर्माण करण्यामध्ये व्यस्त झालेले दिसत आहेत, त्यामुळे सामाजिक आरोग्य सुद्धा धोक्यामध्ये आलेले आहे. जोपर्यंत या तरुणांच्या हाताला काम मिळणार नाही तोपर्यंत देशाची परिस्थिती गंभीरच होत राहील, म्हणून शासनाने त्याचे गांभीर्य ओळखून प्रत्येकाच्या हाताला काम देण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे. महात्मा गांधीचा यंत्राला विरोध होता कारण यंत्रामुळे माणसालाच काम न राहिल्यामुळे तो निष्क्रिय व बेकार बनेल.

**गांधीजींचा विज्ञान विषयक विचार**

त्यांच्या सर्व विचाराप्रमाणेच मानवतेवर आधारित आहे, केवळ वस्तूचे ज्ञान म्हणजे विज्ञान नव्हे, अशी त्यांची धारणा होती. ज्या विज्ञानामुळे माणसाचे कष्ट सुलभ होतील बेरोजगारी न वाढता उलट रोजगार निर्मिती होईल, ही तंत्रे तयार करण्यास व वापरण्यास सोपी असतील, स्थानिक पातळीवर शक्यतो घरच्या घरी निर्माण होऊ शकतील, ती पर्यावरण स्नेही असतील व त्याने व्यक्ती व समाज स्वावलंबी बनेल, अशा यंत्राचा गांधीजींनी स्वीकार केलेला दिसतो. म्हणून ते कमालीचे यंत्रविरोधी किंवा विज्ञानविरोधी तंत्रज्ञान विरोधी होते असे कदापिही नाही, परंतु त्यांच्या मनामध्ये एकच भीती होती की जर विज्ञान-तंत्रज्ञानाची मोठ्या प्रमाणामध्ये प्रगती होऊन अनेक कामे जर त्याच्यामार्फत केली गेली तर अनेक तरुणांचे हात बेकार होतील आणि हे बेकार झालेले हात आपल्या देशाला परवडणारे नाहीत, म्हणून प्रत्येकाला काम मिळण्याच्या दृष्टीने महात्मा गांधीजींनी यंत्राला विरोध केलेला होता. जर जास्त प्रमाणामध्ये यंत्राचा वापर केला गेला तर समाजामध्ये गरिबांची संख्या वाढेल आणि गरिबीमुळे समाजात श्रीमंत व गरीब यांच्यात दरी निर्माण होते, सामान्यता गरिबीमुळे सतत संघर्ष निर्माण होतात, समाजातील चोरी, दरोडे, गुन्हेगारी आदी सामाजिक रोगांचे कारण गरिबीत असते. गरिबीमुळे सामान्य व्यक्तीचे सामाजिक, राजकीय, आर्थिक हक्क हिरावून घेतले जातात. त्यामुळे सामान्य व्यक्ती स्वतःच्या आत्मप्रतिष्ठेचे संरक्षण करू शकत नाही, ती स्वतःचे आत्मभाव व आत्मविश्वास गमावून बसते म्हणून गांधी म्हणतात, सामान्य व्यक्तीत मूलभूत गरजांची पूर्तता करण्याची पात्रता क्षमता व कौशल्य विकसित केली पाहिजेत या दृष्टीने ती सक्षम झाल्यास गरिबीशी दोन हात करू शकेल, तिच्या जीवनाची गुणवत्ता वाढेल, कारण या कार्यक्रमात सामान्य व्यक्तीत स्वतःला मदत करण्याची मानसिकता निर्माण करण्यावर भर आहे. यामुळे ती सक्रिय होईल, ती स्थानिक साधनसामुग्रीचा उपयोग करून स्वतःच्या प्रयत्नाने व इतरांच्या सहकार्याने जीवनउपयोगी वस्तूचे उत्पादन सुरू करेल त्यामुळे तिच्या मूलभूत गरजा पूर्ण होतील. यामुळे समाजात सामाजिक सामंजस्य वाढेल व लोकात स्पर्धा आणि लालसे ऐवजी सहकार्याची भावना वाढीस लागेल व्यक्तीत स्वराज्य उपभोगण्याची उर्मी निर्माण होईल परंतु यासाठी सरकारने रचनात्मक कार्यक्रम आखणे गरजेचे आहे आणि त्याची अंमलबजावणी सुद्धा करणे आवश्यक आहे.

**गरीबी निर्मूलनासाठी केवळ उच्च शिक्षण देऊन भागणार नाही**

तर गांधीजींची जी शैक्षणिक संकल्पना आहे "नई तालीम" किंवा "बुनियादी शिक्षण" या पद्धतीचा अवलंब शिक्षणामध्ये केल्यास प्रत्येक शिक्षण घेणाऱ्या तरुणास काम मिळेल आणि गरिबी निर्मूलनास मदत होईल. म्हणून छोटे छोटे लघुउद्योग, कुटीरोउद्योग उभे करण्याचे प्रशिक्षण देऊन गरीबी निर्मूलन करता येऊ शकते. आपल्या देशासमोर

दारिद्र्य बेकारी व त्यातून उत्पन्न होणारी उपासमार या कायमच्या समस्या आहेत. याला काही नैसर्गिक तर काही अनैसर्गिक कारणे कारणीभूत आहेत पूर वा अनावृष्टीमुळे पडणारा दुष्काळ हे एक नैसर्गिक कारण आहे. पण याबरोबरच सदोष आर्थिक धोरण ही या प्रश्नाला कारणीभूत आहेत. अशा स्थितीत लोकांना आधार देणारा कोणताही व्यवसाय नसतो, कोट्यावधी लोक बेकार होतात, निरुपयोगी होतात. असे बेकारीचे उपासमारीचे जीवन लोकांचे नित्य जीवन बनले आहे. विनाशकारी उद्योगवाद या समस्येवर समाधानकारक उत्तर देऊ शकत नाही, उद्योगवाद्यांनी दारिद्र्य, बेकारी व विषमता नष्ट होत नाही कारण यातील यंत्रांनी उत्पादित वस्तू बाजारात श्रममुल्य इतके खाली आणतात की, कष्टकऱ्यांच्या कुटुंबाला दोन घास मिळणे अशक्य होते. उद्योगवादाचा आधार शोषण असतो मूठभर धनदांडग्यांच्या हातातील अतिरिक्त मूल्यातून एकवटलेली संपत्ती, धन, सत्तेच्या शोषणाला प्रोत्साहन देते, हजारो कामगार बेकार बनवते, उद्योगवादामुळे एक बाजार संस्कृती जन्माला येते, उद्योगात सतत कच्चामाल व बाजाराच्या शोधात असतो, अनावश्यक वस्तू बाजारात आणल्या जातात, त्याचा परिणाम भोगवादी संस्कृती निर्मितीत होतो. हिंसा हा संस्कृतीचा स्वभाव असतो उद्योगात मानवी दुःख, वेदना या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतो. बेकारी व दारिद्र्य कमी करण्यापेक्षा उद्योगात ते वाढते

**विनाशकारी उद्योगवादाला पर्याय खादी**

भारतातील प्रत्येक गावात काम आणि मजुरी देण्याचा अधिक चांगला उपाय सापडत नाही, तोपर्यंत जनसामान्यासाठी खादीच एकमेव खरी आर्थिक योजना आहे, असे प्रतिपादन करून त्यांनी खादीला अन्नपूर्णा म्हटले होते. त्यांच्या मते खादी हा एकमेव सार्वत्रिक उद्योग आहे कारण कोणत्याही ठिकाणी कोणतीही व्यक्ती हा उद्योग करू शकते यातील कताई, बुनाई कौशल्य सुलभ असल्यामुळे कोणीही शिकू शकतो. यासाठी भांडवलही अल्प लागते, म्हणून गांधी म्हणतात कमीत कमी व्यवस्था व खर्चात जास्तीत जास्त 85% भुके, कंगालाचे पोट भरते. असे मानवीय तंत्रज्ञानाचे अद्वितीय उदाहरण खादी ग्रामोद्योग होता. तशा पद्धतीचे उद्योग आज आपल्या देशामध्ये वाढवन खूप महत्त्वाचं आहे. या छोट्या छोट्या उद्योगामुळे गरिबी कमी करता येते जनसामान्याचे श्रम हेच धन असते. पैशाच्या गरजेमुळे कामाची उणीव हा त्याचा रोग आहे. आज ग्रामीण भागातली छोटी छोटी अनेक उद्योग संपुष्टात आलेली आहेत, त्यामुळे सुद्धा गावातील लोकांचे स्थलांतर शहराकडे झालेली आहे आणि शहरे सुद्धा भरमसाठ वाढलेले आहेत आणि त्याचे पर्यावसणशहरात ज्या सोयी सुविधा आहेत त्या कमी पडताना आपल्याला दिसत आहेत. म्हणून खऱ्या अर्थाने देश स्वावलंबी बनवायचा असेल तर गावातले लोक गावात थांबवण्यासाठी त्यांना गावातच काहीतरी उद्योग व्यवसाय करून देणे हे गरजेचं आहे. आणि ते काम सरकारने केलं पाहिजे.

भारताची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे परंतु या शेतीकडे कमालीचे दुर्लक्ष या शासन व्यवस्थेने केलेल दिसून येतं, त्यामुळे अनेक शेतकरी आत्महत्या करताना दिसतात. शेतातील खर्च वाढलेला आहे, खर्चाच्या मानाने त्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी वर्ग नाराज आहे. आणि त्यामुळे शेतीकडून इतर उद्योगाकडे व्यवसायाकडे किंवा सरकारी नोकरी कडे जाण्याचं प्रमाण लोकांमध्ये जास्त दिसून येतं आहे. परंतु सर्वांना सरकारी नोकऱ्या देणं शासनाला शक्य नाही म्हणून गावाकडचा ओढा तिथेच थांबवण्यासाठी गावातच त्यांना उद्योग व्यवसाय निर्माण करून देणं, त्यांच्या हाताला काम निर्माण करून देणे, हे काम लक्षात घेऊन सरकारनं पूर्णत्वाला नेलं तर आणि तरच आपल्या देशाचा विकास होऊ शकेल. आणि देशातील गरिबी आपल्याला बऱ्याच अंशी कमी करण्याला यश येईल असा माझा विश्वास आहे.

देशातील बहुअंशी लोक शेती व शेती व्यवसायावर अवलंबून आहेत शेतीतून त्यांना पुरेशी उत्पन्न मिळत नाही, कारण भारतातील शेती आकाराने लहान आहे त्यात वापरली जाणारे तंत्रे मध्ययुगीनकालातील आहेत, सिंचना अभावी शेती निसर्गाच्या पावसावर अवलंबून आहे, शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना पावसाळी पीक घेतल्यानंतर चार महिने काही काम नसते, म्हणून ते बेकार राहतात. ही बेकारी त्यांच्या दारिद्र्याला कारणीभूत ठरते, बेकारी व दारिद्र्यातून खेड्यातील लोकांना मुक्त करण्यासाठी ग्राम उद्योग व कुटूर उद्योग हा चांगला पर्याय आहे. त्यामुळे सरकारने या बाबीकडे

लक्ष वेधले पाहिजे. देशामध्ये मोठे कारखाने उभारल्यास खेड्यातील बेकारी व दारिद्र्य नष्ट होणार नाही, कारण मोठे कारखाने निघाले की लहान ग्राम उद्योग संपतात, खेड्यातील लोकांना काम मिळत नाही, मोठ्या कारखान्यात मनुष्यबळापेक्षा यंत्राचा अधिक वापर होतो, त्यामुळे मोठ्या उद्योगात कामगार कमी लागतात. ज्यावेळी कामगार कमी व काम अधिक अशी स्थिती असते तेव्हा मोठे उद्योग व यांत्रिकीकरण उपयुक्त असते. परंतु भारतात कामगारांची संख्या अधिक आहे तेव्हा त्यांना काम देण्यासाठी ग्राम उद्योगच उपयुक्त ठरतात. म्हणून सरकारने गांधीजींच्या या म्हणण्याकडे लक्ष दिलं पाहिजे. गावातील छोट्या छोट्या उद्योगाचे व आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण असते. संपत्तीचे मूठबरांच्या हातात केंद्रीकरण होत नाही. राष्ट्रीय उत्पन्नाचे सम प्रमाणात वितरण होते. यामुळे दारिद्र्य व बेकारी नष्ट होते, ग्राम उद्योगामुळे उपासमार या सारख्या प्रश्नावर मात करणे शक्य होते. बहुसंख्य व्यक्तींना मिळणाऱ्या रिकाम्या वेळेचा राष्ट्र उभारणीसाठी उपयोग करून घेता येतो, खेडी स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनतात शहरी व खेड्यातील लोकांत संवाद सुरू होतो, त्यांच्यात एक भावनिक अनुबंध निर्माण होईल, निर्जीव झालेल्या खेड्यांना नवे जीवन मिळेल, खेड्यातील लोकांना त्यांच्यात प्रचंड प्रमाणात असलेल्या सुप्त शक्तीचा परिचय होईल, म्हणून ग्रामोद्योग अनेक कारणास्तव उपयुक्त आहे.

ग्राम उद्योगाचे स्वरूप स्पष्ट करताना महात्मा गांधीजी म्हणतात ग्रामोद्योग सुरू करण्यासाठी अत्यंत अल्प भांडवल लागते, ग्राम उद्योग सुरू करण्यासाठी सोपे ज्ञान पुरेस असते. म्हणून किमान कौशल्य असलेली कोणतीही सामान्य व्यक्ती देखील हा उद्योग सुरू करू शकते. या उद्योगात कुटुंबातील स्त्री-पुरुष, तरुण-वृद्ध व्यक्तींनाही सहभागी करून घेता येते. ग्रामउद्योग अन्य काम असताना, फावल्या वेळेत देखील करता येतो. ग्राम उद्योगातील व्यक्ती स्वतंत्र असते स्वेच्छे प्रमाणे व्यवसाय निवडून करू शकते. तिच्यावर अन्य कोणाचीही बंधने नसतात, त्यामुळे तिच्या कौशल्यांना व सर्जनशीलतेला अवसर मिळतो. यातील उत्पन्नाचा लाभ संबंधित व्यक्तीला होतो, यामुळे संपत्तीचे केंद्रीकरण होत नाही. यामुळे समाज-समाजातील गरीब- श्रीमंतीची दरी दूर होण्यास मदत होईल.

आजची शिक्षण पद्धती सुद्धा गरिबीसाठी कारणीभूत आहे. अनेक उच्चशिक्षित तरुण इंजिनीयर पदवीधर आज बेकार असलेले आपणास पाहावयास मिळतात, यातून एकच विचार समोर येतो आजच्या काळातलं उच्च शिक्षण भाकरीचा प्रश्न सोडवताना दिसत नाही. म्हणून शिक्षणाने तरुणांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण झाली पाहिजे. मानवी जातीतील दारिद्र्य आणि बेकारी कशी संपवता येईल, लोकांच्या मूलभूत गरजा कशा पूर्ण करता येतील, ग्रामीण जीवन कसे बदलता येईल. यासाठीचे शिक्षण देणे आवश्यक आहे. आणि ते दिले पाहिजे अशा विचाराचे गांधी होते. शिक्षणाने हे सर्व प्रश्न सोडवण्यास मदत केली पाहिजे, म्हणून त्यांनी पुस्तक केंद्रित शिक्षणाऐवजी हस्तोद्योग केंद्रित शिक्षणाचा पुरस्कार केला आणि तशाच प्रकारच्या शिक्षणाची आज सुद्धा गरज आहे. आजचे जे शिक्षण जगण्यासाठी कला हस्तगत करून देत नाही, अस शिक्षण काय कामाचे शिक्षणातून विद्यार्थ्यांचे आणि समाजाचे प्रश्न सुटत नसतील तर ते शिक्षण काय कामाचे म्हणून शिक्षणात श्रम व उत्पादकता यावर अधिक भर दिला पाहिजे, शिक्षणात त्या परिसराच्या भौतिक व सामाजिक गरजांचे प्रतिबिंब उमटले पाहिजे. त्यातून भूक, दारिद्र्य आणि बेकारी आदी प्रश्न सोडवण्यास मदत झाली पाहिजे. म्हणून हस्त व्यवसायातून शिक्षण या कल्पनेचा आग्रह गांधीजी धरतात.

त्यांच्या मते हस्तव्यवसायातून शिक्षण झाल्याशिवाय व्यक्ती व समाज आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर होणार नाही, त्यामुळे बुनियादी शिक्षणाची आवश्यकता आहे असे त्यांचे मत आहे. आजच्या तरुणांमध्ये शारीरिक श्रम करण्याची सवय नाहीशी झालेली आहे, शारीरिक श्रमाला ते दुय्यम समजतात आणि त्यातून दारिद्र्य बेकारी वाढलेली आहे. म्हणून प्रत्येकाच्या बौद्धिक क्षमता ओळखून, शारीरिक क्षमता ओळखून, त्यांना किमान कौशल्य प्राप्त होईल अशा पद्धतीचे शिक्षण देणे गरजेचे आहे.

गांधीजींचे स्वप्न पूर्ण करण्याचे थोडे फार प्रयत्न देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी करताना दिसत आहेत आज वेगवेगळया औध्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये विद्यार्थी संख्या वळलेली दिसत आहे. देशामध्ये किमान कौशल्यावर आधारित

प्रशिक्षण देणाऱ्या छोट्या-मोठ्या संस्था निर्माण होऊन त्यांना प्रशिक्षण देऊन उद्योग, व्यवसायाकडे वळवले जात आहेत. परंतु भारतासारख्या एवढ्या मोठ्या देशांमध्ये अत्यंत अल्प प्रमाणामध्येप असे शैक्षणिक प्रकल्प राबवले जात आहे, अशा प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांची वाढ करून जास्तीत जास्त तरुणांना प्रशिक्षित करून छोट्या-मोठ्या उद्योगाकडे त्यांना वळवल्यास देशातील गरिबी काही प्रमाणात का होईना दूर करणं शक्य होईल. यासाठी शासनाने याकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे असे माझे मत आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. लाल बसन्त कुमार, समकालीन भारतीय दर्शन, मोतीलाल बनारसीदास, प्रकाशन, दिल्ली
२. भोळे भा. ल. आधुनिक भारतातील राजकीय विचार, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ.
३. कुंभार ना. ल. महात्मा गांधीचे सामाजिक तत्त्वज्ञान, अरुणा प्रकाशन, लातूर
४. कुंभार ना. ल. सत्याग्रह म. गांधीचा दृष्टीकोन, प्रबोधन प्रकाशन,लातूर.
५. गांधी मो. क. हिंद स्वराज्य साकेत प्रकाशन, औरंगाबाद